महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती


# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : २२६ वे | दिनांक : ११/०८/२०२६ | वार : मंगळवार

## जरांगे आक्रमक; दरेकरांना जागा दाखवण्याचा इशारा, सरकारला शेवटची संधी!



**सांगली :** मराठा समाजाच्या कुणबी नोंदी आणि प्रमाणपत्रे रद्द करण्याच्या राज्य सरकारच्या कथित भूमिकेवरून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा संताप व्यक्त केला आहे. "पदाचा आणि मंत्रिपदाचा गैरवापर करून महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मराठा समाजाच्या लेकरांवर अन्याय केला आहे. आता सरकारने आणि विशेषतः एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस यांनी आपली चूक तातडीने सुधारावी, अन्यथा मराठे त्यांना घरी बसवल्याशिवाय राहणार नाहीत," असा थेट इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला आहे. सांगलीत माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी राज्य सरकार, बावनकुळे आणि आमदार प्रवीण दरेकर यांच्यावर सडकून टीका केली.

मराठा समाजाच्या जुन्या नोंदी रद्द करण्यासाठी दिलेल्या पत्राच्या मुद्द्यावर बोलताना जरांगे पाटील म्हणाले, "सध्या हे सरकार मराठा समाजाच्या नोंदी कशा रद्द करायच्या, यासाठी रोज नवीन डाव शोधत आहे. कुणबी नोंदी रद्द करताना काहीतरी वेगळीच कारणे दिली जात आहेत. कधी म्हणतात नोंदीवर 'कुढ कुच' (खाडाखोड) लिहिले आहे, तर कधी म्हणतात पेनाने लिहिले आहे. ५०-१०० वर्षांपूर्वी सातबारे प्रिंटेड नव्हते, ते तलाठी हातानेच आणि पेनानेच लिहायचे. मग आता अक्षर बदलले म्हणून नोंदी कशा रद्द होऊ शकतात? बावनकुळेंना इतके कळत नाही का?"

जात पडताळणी समितीच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित करताना जरांगे म्हणाले, "देवेंद्र फडणवीस नेहमी सांगतात की, 'जात पडताळणी समिती सुप्रीम कोर्टाच्या आदेशाप्रमाणे चालते आणि सरकार त्यात हस्तक्षेप करत नाही.' मग बावनकुळेंनी स्वतःच्या अधिकारात पत्र काढून त्यावर सांकेतिक भाषेत 'अ' लिहून 'त्वरित कारवाई करा' असे आदेश कसे दिले? 'अ' लिहिणे याचा अर्थ त्या प्रस्तावाला प्रथम प्राधान्य देणे. जर सरकार हस्तक्षेप करत नसेल, तर मग अशा पत्राचा अर्थ काय? हा उघड उघड हस्तक्षेप आहे."

भाजप आमदार प्रवीण दरेकर यांनी नुकतेच 'जरांगेंची पाडण्याची क्षमता सिद्ध झाली आहे,' असे वक्तव्य केले होते. यावर संतापलेले जरांगे म्हणाले, "दरेकरांनी गरिबाच्या लेकरांना हिणवायचे थांबवावे. मराठ्यांची ताकद काय आहे, हे त्यांना थोडे दिवस थांबू द्या, बरोबर समजेल. मराठ्यांच्या जिवावर निवडून आलेले हे नेते पक्षासाठी लाचार झाले आहेत, त्यामुळे त्यांना मराठा बाप वाटत नाहीये. पण फडणवीसांमुळे दरेकरांचा किती देव्हारा होणार आहे, हे लवकरच दिसेल."

"देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी बावनकुळेंची चूक मान्य करून ती त्वरित दुरुस्त करावी. ५८ लाख नोंदी सापडल्या आहेत, त्याचे प्रमाणपत्र समाजाला मिळायलाच हवे. जर सरकारने चूक सुधारली नाही आणि मराठ्यांच्या लेकरांच्या भविष्याशी असाच खेळ सुरू ठेवला, तर हाती काहीही राहणार नाही. मराठे आता खवळले आहेत, ते तुम्हाला घरी बसवतील," असा इशारा जरांगे यांनी दिला.

भाजप आमदार नितेश राणे यांनी अलीकडेच मराठा आरक्षणाबाबत घेतलेल्या भूमिकेवर जरांगे यांनी समाधान व्यक्त केले. ते म्हणाले, "अडीच वर्षे मराठ्यांच्या विरोधात असलेले राणे आता मराठ्यांच्या बाजूने बोलू लागले आहेत. ही खूप चांगली गोष्ट आहे. जे लोक समाजाच्या बाजूने बदलले आहेत, त्यांचे स्वागतच केले पाहिजे. किमान त्यांना आता समाजाची जाणीव तरी होऊ लागली आहे." एकूणच कुणबी प्रमाणपत्रांच्या रद्द होण्याच्या मुद्द्यावरून मनोज जरांगे पाटील यांनी आक्रमक पवित्रा घेतला असून, आगामी काळात हे आंदोलन पुन्हा एकदा तीव्र होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राधान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

## बिल्डरांच्या नादी लागून महाराष्ट्र १० वर्षे मागे नेला

**मुंबई :** वनमंत्री आणि भाजप नेते गणेश नाईक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर अप्रत्यक्षपणे, मात्र अत्यंत खरमरीत शब्दांत निशाणा साधला आहे. सानपाडा येथे आयोजित एका कार्यक्रमात बोलताना त्यांनी शिंदेंच्या कार्यपद्धतीवर, विशेषतः क्लस्टर योजनेच्या अंमलबजावणीवर कडक शब्दांत टीका केली. "बिल्डरांच्या नादी लागून या लोकांनी महाराष्ट्र १० वर्षे मागे नेला आहे," असा खळबळजनक आरोप त्यांनी केला. या वक्तव्यामुळे महायुतीत मोठी राजकीय खळबळ उडाली आहे.

### काय म्हणाले गणेश नाईक?

नवी मुंबई आणि आसपासच्या परिसरातील पुनर्विकासाच्या मुद्द्यावर बोलताना गणेश नाईक आक्रमक झाले होते. ते म्हणाले, "कॉलनीमध्ये २० वर्षांपूर्वी बांधलेल्या घरांची पुनर्बांधणी ही साध्या पुनर्विकासाऐवजी जर क्लस्टर योजनेतून होत असेल, तर ते या शहरासाठी फार घातक आहे. कॉलनी भागातील इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी क्लस्टर योजना लागू करणे, हे सरळसरळ बिल्डरांच्या घशात पैसे घालण्यासारखे आहे."

"स्वतःच्या फायद्यासाठी यांनी बिल्डरांच्या नादी लागून महाराष्ट्र दहा वर्षे मागे नेला आहे. जर कोणी असा प्रयत्न केला, तर त्यांच्या घशातून पैसे काढण्यात येतील. आम्हाला बुद्धू समजून कुणी टपली मारणार असेल, तर त्याचा हात धरून त्याची लायकी दाखवण्याची ताकद माझ्यात आहे. जनतेला गृहीत धरून कोणी नाटक करणार असेल, तर त्या नाटकाचा तमाशा कसा करायचा, हे गणेश नाईक दाखवून देईल."

### आदित्य ठाकरेंची शिंदेंवर टीका

गणेश नाईक यांच्या या वक्तव्याचा आधार घेत ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनीही एकनाथ शिंदे यांच्यावर हल्लाबोल केला. ते म्हणाले, "मंत्र्यांकडे (गणेश नाईक) खूप डेटा येत असतो, त्यामुळे ते जे बोलत आहेत, ते कदाचित खरेही असू शकते. एकनाथ शिंदेंनी दहा वर्षांत काय, तर कितीतरी शेकडो वर्षे माणुसकीला मागे नेलेले आहे. जेव्हा केव्हा त्यांच्यावर केस लागण्याची शक्यता असते, तेव्हा ते दरेगावला का पळतात? याचा आपण सर्वांनी विचार करायला हवा."

### गृहराज्यमंत्री योगेश कदमांचा पलटवार

गणेश नाईकांच्या या जहरी टीकेनंतर महायुतीतील शिंदे गटाचे नेते आणि गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी त्यांना जोरदार प्रत्युत्तर दिले. "गणेश नाईक यांनी आता हे थांबवले पाहिजे. आपण महायुतीमध्ये एकत्र काम करत आहोत. एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री म्हणून अडीच वर्षे समर्थपणे काम केले आहे. जर शिंदेंनी तो उठाव केला नसता, तर आज गणेश नाईक साहेब मंत्री देखील झाले नसते, याची जाणीव त्यांनी ठेवायला हवी."

### वरिष्ठांकडे गाऱ्हाणे मांडा

"देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांच्यात अत्यंत चांगले संबंध आहेत. महायुतीमध्ये कुठेही कटुता येऊ नये, याची जबाबदारी नाईकांसारख्या वरिष्ठ नेत्यांनी घेतली पाहिजे. त्यांच्या मनात जी काही खदखद असेल, ती त्यांनी आपल्या वरिष्ठांकडे मांडावी आणि तो विषय कायमस्वरूपी संपवावा, अशी माझी त्यांना विनंती आहे."

### महायुतीतील मतभेद पुन्हा चर्चेत

गणेश नाईक यांच्या 'बिल्डरांच्या नादी लागून महाराष्ट्र 10 वर्षे मागे नेला' या वक्तव्यामुळे महायुतीतील अंतर्गत राजकारण पुन्हा चर्चेत आलं आहे. नाईक यांनी थेट एकनाथ शिंदे यांचं नाव घेतलं नसलं, तरी योगेश कदम यांनी शिंदेंची बाजू घेत नाईकांना सुनावल्याने या वक्तव्याचा राजकीय रोख स्पष्ट झाला आहे. एकीकडे गणेश नाईक यांची नाराजी, दुसरीकडे योगेश कदमांचा पलटवार आणि त्यात आदित्य ठाकरे यांनी साधलेला निशाणा यामुळे पुनर्विकास आणि क्लस्टर योजनेच्या मुद्द्याला आता राजकीय रंग चढला आहे. महायुतीतील वरिष्ठ नेते या वादावर कशी भूमिका घेतात, याकडे आता राजकीय वर्तुळाचं लक्ष लागलं आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ११ ऑगस्ट २०२६


## इकरा पब्लिक स्कूलमध्ये पोस्टर सादरीकरणाद्वारे फास्ट फूडच्या दुष्परिणामांबाबत जनजागृती



**जळगाव :** जळगाव येथील इकरा पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये फास्ट फूडचे घातक परिणाम आणि संतुलित आहाराचे महत्त्व पटवून देणारे माहितीपूर्ण व आकर्षक पोस्टर सादरीकरण आयोजित करण्यात आले होते. विद्यार्थ्यांमध्ये निरोगी खाण्याच्या सवयी आणि चांगल्या आरोग्याचे महत्त्व रुजवण्यासाठी इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचे आयोजन केले होते.सादरी करणादरम्यान, हुजेफा चौधरी या विद्यार्थ्याने फास्ट फूड आणि जंक फूडच्या अतिसेवनाने होणाऱ्या दुष्परिणामांवर प्रकाश टाकला.अस्वस्थ खाण्याच्या सवयींमुळे पचनसंस्थेवर कसा विपरीत परिणाम होतो आणि विद्यार्थ्यांच्या एकूण आरोग्यावर कसा वाईट प्रभाव पडतो, हे त्याने स्पष्ट केले. त्याच्या वर्गमित्रांनी विविध प्रकारच्या फास्ट फूडची चित्रे असलेली रंगीबेरंगी पोस्टर्स प्रदर्शित करून त्याचे समर्थन केले आणि जंक फूडचे दुष्परिणाम समजावून सांगितले.तसेच विद्यार्थ्यांनी संतुलित व पौष्टिक आहाराचे महत्त्व सांगणारा खंबीर संदेश दिला. मरियम पटेल आणि तिच्या गटाने नैसर्गिक फळे व निरोगी आहाराच्या पर्यायांवर आधारित आकर्षक पोस्टर्स तयार केली होती. अर्शिया, जन्नत आणि मरियम पटेल यांनी दैनंदिन आहारात पौष्टिक अन्नाचा समावेश करण्याचे आणि चांगल्या आहाराच्या सवयी विकसित करण्याचे महत्त्व पटवून दिले.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना सृजनशीलता,संवाद कौशल्य आणि आरोग्य शिक्षण यांचा उत्तम मेळ घालण्याची संधी मिळाली.विद्यार्थ्यांचा उत्साही सहभाग आणि समन्वयाने केलेले प्रयत्न यातून उत्कृष्ट संघभावना आणि आत्मविश्वास दिसून आला.या पोस्टर व सादरीकरणाच्या तयारीसाठी जियाउन्निसा मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व सहकार्य केले. विद्यार्थ्यांची सृजनशीलता, आत्मविश्वास,आरोग्यविषयक जाणीव आणि संघभावनेबद्दल शाळेचे प्राचार्य व शिक्षकांनी त्यांचे विशेष कौतुक केले.

## जालनाच्या जेईएस महाविद्यालयात संत गजानन महाराजांच्या पालखी दर्शनासाठी भाविकांची गर्दी

**जालना (प्रा डॉ राजेंद्र सोनवणे)** : जेईएस महाविद्यालय जालना येथे शेगावचे श्री.संत गजानन महाराज यांच्या पालखीचे आगमन झाल्यावर उत्साहात, चैतन्यमय वातावरणात स्वागत करण्यात आले . यावेळी जालना एज्युकेशन संस्थेचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम बगडिया, सचिव श्री. श्रीनिवासजी भक्कड प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी - विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.श्री विठ्ठल क्षेत्र, पंढरपूर येथून परतीच्या प्रवासात श्री संत गजानन महाराज यांची दिंडी व पालखीचे दि. 10 ऑगस्ट 2026, सोमवार रोजी सकाळी11 वाजता भक्तिमय वातावरणात, टाळ - मृदुंगाच्या गजरात, रामकृष्ण हरी च्या नामस्मरण तसेच जगद्गुरु तुकोबारायांच्या अभंग गात 500 वारकऱ्यांना समावेत श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचे उत्साहात जेईएस महाविद्यालय जालना येथे आगमन झाले. जालना शहरातील भक्तांच्या दर्शनासाठी महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर पालखीचा मुक्काम होता. जालना एज्युकेशन सोसायटीच्या व्यवस्थापन समिती तसेच प्राचार्य व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी- विद्यार्थीनी पालखीतील व दिंडीतील वारकऱ्यांचे पुष्प उधळून स्वागत केले.सायंकाळी श्री गजानन महाराजांच्या पालखीचे जालना शहरातील नागरिकांची दर्शनासाठी मोठी गर्दी होती जवळपास 30 ते 40 हजार भाविकांनी दर्शन घेतल्याचे सांगण्यात आले.






## स्त्री साठी मातृत्व हा जिवनातील सर्वोच्च आनंदाचा क्षण



**कन्नड (अरुण थोरात) :** कन्नड शहरातील जाधव नर्सिंग होम येथे आयोजित वंध्यत्व निवारण शिबिराचे उद्घाटन कन्नड नगरीच्या नगराध्यक्ष फरीन बेगम अब्दुल जावेद यांच्या शुभहस्ते दि.१० ऑगस्ट रोजी संपन्न झाला. या प्रसंगी ग्रामीण पोलीस स्टेशनचे पो. निरीक्षक नारायण गीते यांची प्रमुख उपस्थिती होती. छत्रपती संभाजीनगर येथील मी अँड मम्मी व जाधव नर्सिंग होम यांच्या संयुक्त विद्यमाने ही शिबिर संपन्न झाली. याप्रसंगी नगराध्यक्ष म्हणाल्या की स्त्रीच्या जीवनात मातृत्वा चे मोठं स्थान आहे. व माते साठी आनंदाचा क्षण असतो. प्रत्येक माता ही संततीसाठी आपल्या जीवनाची परवाह न करता आपल्या बाळाला बाळाच्या वेदना सहन करते व एक बाळाला जन्म देते बाळंतपणा चा दिवस हा तिच्यासाठी जगातील सर्वात मोठा आनंदाचा दिवस असतो. पोलीस निरीक्षक नारायण गीते म्हणाले जाधव हॉस्पिटल हे सर्व सामान्य लोकांचं रुग्णालय आहे या ठिकाणी मी नेहमीच भेट देण्यासाठी येत असतो कमी खर्चात व विश्वासाचे स्थान म्हणजेच जाधव नर्सिंग होम हे आहे. वैद्यकीय सेवेबरोबर कृषी क्षेत्रातील डॉ. सिताराम जाधव यांनी आपलं नाव लौकिक केलेलं आहे असे ते म्हणाले. या प्रसंगी जाधव डायग्नोस्टिक चे रेडिओलॉजिस्ट डॉ. रविराज जाधव यांनी आपले विचार मांडले. याप्रसंगी कृषीभूषण डॉ एस जे जाधव, जाधव हॉस्पिटल चे प्रशासकीय अधिकारी डॉ. सदाशिव पाटील, स्त्री रोग तज्ञ डॉ अय्याज उजाडे, डॉ गोपाल पाचोळे, यांची प्रमुख उपस्थिती होती. स्त्री रोगतज्ञ डॉ. योगेश शिंदे यांच्या नेतृत्वाखाली डॉ राखी जैन यांनी रुग्णांची तपासणी केली. या शिबिरामध्ये ५६ स्त्री रुग्णांची तपासणी करण्यात आली. शिबिरामध्ये भाग घेणाऱ्या रुग्णांना ऑपरेशन लागल्यास २० टक्के सवलत देण्यात येईल असेही डॉ. राखी जैन म्हणाल्या .डॉ साजिया पठाण व डॉ. सना शेख यांनी सहकार्य केले. शिबिर यशस्वी करण्यासाठी रामनाथ फाळके पाटील, सचिन गिरे, योगेश आहेर, विकास खाजेकर, सागर राठोड, राज ठाकूर, जितू राठोड, विश्वास राऊत, तसेच जाधव हॉस्पिटलच्या स्टाफ मंदा भोसले, रूपाली आहेर, निकिता पवार, कविता धनके, संजना राठोड, मोहिनी सिस्टर,ज्योती साळवे, प्रतिभा धनेधर, जनाबाई जाधव, तोफिक बागवान, निमा जाधव, राहुल सोनवणे इत्यादी कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले आभार डॉ. विलास सदाफळे यांनी मानले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002


# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ११ ऑगस्ट २०२६


# मानवी जीवनात खेळांचे महत्त्व

प्रस्तावनामानवी जीवनात खेळाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. खेळ म्हणजे केवळ वेळ घालवण्याचे साधन नाही, तर ते जीवन जगण्याची एक शाळा आहे. प्राचीन काळापासून माणूस खेळांद्वारे स्वतःला तंदुरुस्त आणि आनंदी ठेवत आला आहे.शारीरिक आरोग्यासाठी खेळखेळ हे चांगल्या आरोग्याचा पाया आहे. नियमित खेळ खेळल्याने आपले शरीर मजबूत, लवचिक आणि सुदृढ होते. रक्ताभिसरण सुधारते, हृदय आणि फुफ्फुसे चांगली काम करतात. लठ्ठपणा, मधुमेह, रक्तदाब यांसारखे आजार खेळांमुळे दूर राहतात. लहानपणापासून खेळणाऱ्या मुलांची उंची आणि रोगप्रतिकारक शक्ती चांगली असते.मानसिक विकासासाठी खेळखेळ फक्त शरीरासाठीच नाही तर मनासाठीही खूप आवश्यक आहेत. खेळल्याने मनावरील ताण कमी होतो आणि आनंदी वाटते. यामुळे एकाग्रता, स्मरणशक्ती आणि आत्मविश्वास वाढतो. खेळातून आपल्याला हार-जीत दोन्ही स्वीकारायला शिकायला मिळते. यामुळे माणूस खंबीर आणि संयमी बनतो.सामाजिक जीवनात खेळांचे योगदानखेळामुळे माणसात सांघिक भावना निर्माण होते. एका संघात खेळताना आपण एकमेकांना मदत करायला, सहकार्य करायला आणि आदर करायला शिकतो. मैदानावर जात-पात, श्रीमंत-गरीब असा भेदभाव नसतो. त्यामुळे समाजात एकता आणि बंधुभाव वाढतो. शिस्त, वेळेचे पालन आणि प्रामाणिकपणा हे गुणही खेळांमधूनच येतात.खेळ आणि करिअरपूर्वी खेळाकडे करिअर म्हणून पाहिले जात नव्हते. पण आज खेळ हे सन्मानाचे आणि पैशाचेही मोठे क्षेत्र बनले आहे. क्रिकेट, फुटबॉल, सेपकटकरॉ सारख्या खेळांमधून अनेक खेळाडू देशाचे नाव जगभरात उंचावत आहेत.निष्कर्षशेवटी असे म्हणता येईल की, खेळ हे जीवनातील अविभाज्य घटक आहेत. ते आपल्याला निरोगी ठेवतात, चारित्र्य घडवतात आणि चांगले नागरिक बनवतात. म्हणून प्रत्येकाने शिक्षणासोबतच खेळालाही तितकेच महत्त्व दिले पाहिजे. कारण "A sound mind in a sound body" हे केवळ खेळांमुळेच शक्य आहे.



**आमिर एजाज खान**
**क्रीडा शिक्षक इकरा पब्लिक स्कूल जळगाव**

# फतियाबादजवळ दुचाकी घसरून अपघात; चौघे किरकोळ जखमी

**दौलताबाद (जावेद अहेमद) :** धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५२ वर फतियाबाद गावाजवळील भारत धाब्यासमोर दुचाकी घसरून झालेल्या अपघातात एकाच कुटुंबातील चौघे किरकोळ जखमी झाले. ही घटना रविवारी (दि. ९) सकाळी साडेदहाच्या सुमारास घडली.एमएच २० जीपी ६३१६ क्रमांकाच्या शाईन दुचाकीवरून नवनाथ मनोहर आरके (वय ३८), अनिता मनोहर आरके (३७), समर्थ नवनाथ आरके (८) आणि ईश्वरी नवनाथ आरके (४, सर्व रा. चितेगाव, ता. पैठण) हे प्रवास करीत होते. फतियाबादजवळ दुचाकी घसरल्याने चौघांनाही किरकोळ दुखापत झाली.अपघाताची माहिती मिळताच माळीवाडा परिसरात २४ तास सेवा देणारी जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य यांच्या प्रेरणेने सुरू असलेली मोफत रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली. रुग्णवाहिकेने चौघांनाही माळीवाडा येथील खाजगी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार करण्यात आले.

## ९ ऑगस्ट जागतिक आदिवासी दिनानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडीतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप



**खुलताबाद (सनिराम गावंडे) :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ठाकरवाडी येथील विद्यार्थ्यांना ग्रामस्थांच्या वतीने वह्या, उजळणी पुस्तके,पेनांची मोफत वाटप करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला प्रोत्साहन मिळावे आणि आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची कमतरता भासू नये, या उद्देशाने ग्रामस्थांनी हा उपक्रम राबविला.यावेळी विद्यार्थ्यांना मोफत वह्या व उजळणी पुस्तिकांचे वाटप करण्यात आले. ग्रामस्थांच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. शैक्षणिक साहित्य मिळाल्याने विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी मोठी मदत होणार आहे. आदिवासी ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आदिवासी ठाकर समाजाच्या ग्रामस्थांनी घेतलेला हा पुढाकार कौतुकास्पद असून, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना शिक्षणाची गोडी लागण्यास तसेच त्यांच्या शैक्षणिक विकासाला चालना मिळण्यास मदत होते.शाळेतील मुख्याध्यापक श्री गालफाडे, सहशिक्षका श्रीमती घोरपडे, श्रीमती पाटील यांनी ग्रामस्थांचे आभार मानत भविष्यातही विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी असेच सहकार्य मिळावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ११ ऑगस्ट २०२६


## प्रोफेसर डॉ. पंढरीनाथ रोकडे यांच्या क्रीडा क्षेत्रातील३४ वर्षांच्या अतुलनीय कार्याबद्दल कुलगुरूंच्या हस्ते सन्मान




***छायाचित्र :*** *डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वार्षिक क्रीडा नियोजन बैठकीत कुलगुरू प्रो. डॉ. विजय फुलारी यांच्या हस्ते प्रो. डॉ. पंढरीनाथ रोकडे यांचा सेवागौरव. यावेळी अर्जुन पुरस्कार विजेती सारिका काळे, प्रो. डॉ. सचिन देशमुख व प्रो. डॉ. कल्पना झरीकर उपस्थित.*

**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या क्रीडा विभागाने आयोजित केलेल्या वार्षिक क्रीडा नियोजन २०२६-२७ च्या कार्यक्रमात, मोरेश्वर महाविद्यालयाचे माजी क्रीडा विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. पंढरीनाथ रोकडे यांचा गेल्या ३४ वर्षांतील क्रीडा क्षेत्रातील अतुलनीय व समर्पित कार्याबद्दल सेवागौरव करण्यात आला.हा कार्यक्रम विद्यापीठाच्या नाट्यगृहात संपन्न झाला. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू मा. प्रोफेसर डॉ. विजय फुलारी यांच्या शुभहस्ते प्रो. डॉ. पंढरीनाथ रोकडे यांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितीत अर्जुन पुरस्कार विजेती व मराठवाड्याची प्रसिद्ध खो-खो खेळाडू सारिका काळे, विद्यापीठाचे क्रीडा विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. सचिन देशमुख, शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. कल्पना झरीकर तसेच इतर मान्यवर उपस्थित होते.प्रो. डॉ. पंढरीनाथ रोकडे यांनी या प्रसंगी आपल्या भावना व्यक्त करताना म्हटले की, “हा क्षण माझ्या आयुष्याच्या पानात कायमची सुवर्णरेषा होऊन राहील.” त्यांनी विद्यापीठ प्रशासन, क्रीडा विभाग तसेच विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयातील क्रीडा संचालक सहकाऱ्यांप्रति आभार व्यक्त केले.या कार्यक्रमास विद्यापीठाचे माजी व्यवस्थापन परिषद सदस्य बाबा सलामपुरे, क्रीडा मंडळ सदस्य डॉ. उदय डोंगरे, प्रा. सुरेश मिरकर, डॉ. संदीप जगताप, डॉ. बप्पा मस्के, डॉ. चंद्रजीत जाधव, डॉ लक्ष्मण जाधव, डॉ सुरेश नरवडे डॉ. पी. एल. कराड, डॉ. सानप, डॉ. डी. के. कांबळे, डॉ. प्रशांत तोर, डॉ. बब्बू शेख, डॉ. विश्वंभर तनपुरे, डॉ. संतोष वनगुजरे, डॉ. गोविंद कदम, डॉ. प्रशांत वर्मा यांच्यासह क्रीडा क्षेत्रातील अनेक दिग्गज मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमात क्रीडा क्षेत्रातील विविध, समस्या तसेच विविध मुद्द्यांवर चर्चा झाली

## आम्ही माणसं

मेलेल्या वासराला चाटणाऱ्या गाईसारखीच,
हाडामासाची,बुद्धीगहाण मेंदुची
*आम्ही माणसं*.

अंधश्रध्देच्या विळख्यात अडकलेले
सर्कशितील बंद पिंजऱ्यातील
सर्कसीच्या,शो-तील
*आम्ही माणसं.*

लाडक्या बहिणी, पाच किलो रॅशन
यात समाधान मानून, मत विकणारी , समाधानी
*आम्ही माणसं*.

बापाच्या जयंतित्त,लग्नात डिजे
सोमरस पिऊन, दांगडधिंगा ,
तालात नाचणारी ,
*आम्ही माणसं.*

समाज,व्यवस्था परिवर्तन परिवर्तनवादी संताची ,गुरूची,
महापुरुषांची ,नायकाची भारतभूमी वांझ करणारी,
*आम्ही माणसं*.
भीमा कोरेगाव,नामांतर लढा
मंडल लढा, शौर्याची गाथा
भीमा नदीत बुडविनारी
सत्तेतील रामदासी वृत्तीची
*आम्ही माणसं*...
*मधुबानंदा,
प्रधान.अकोला

**मधुबानंदा प्रधान**
**सेवानिवृत्त वरिष्ठ रसायनशास्त्रज्ञ**
**अकोला. ९४२१७१९९१७**

## "हे जग म्हणजे खऱ्या अर्थाने घरघरते जातेच होय" मा. संचालक प्रा. विजयकुमार गवई




**छत्रपती संभाजीनगर :** "साहित्य हा जगाचा जसा केंद्रबिंदू आहे तसे साहित्याचा केंद्रबिंदू जगासोबतच माणूस हा आहे आणि माणसाच्या परिघा भोवतीच सबंध साहित्य विश्व फिरते आहे , त्यामुळेच माय माती मातृभूमी जन जल जंगल या घटकाभोवतीच साहित्य विश्वाच्या आदी आणि अनंत काळापासून फिरते आहे. घरघरते वं जातं ... हीच संकल्पना साहित्य विश्वाला सातत्यपूर्ण आणि परिवर्तनीय ठरवते." असे प्रतिपादन माहिती प्रसारण विभागाची माजी संचालक प्रा. विजयकुमार गवई यांनी 'लेखन प्रेरणा दिवसा' निमित्त केले .डॉ. बाबासाहेब आंबेडकर कला व वाणिज्य महाविद्यालयात साहित्यसम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त विशेष उपक्रमात 'लेखक आपल्या भेटीला' या अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या मराठी विषयात अभ्यासक्रमात असलेल्या लेखक कवींची प्रत्यक्ष संवाद साधण्याचा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात प्रसिद्ध कवी देवानंद पवार आणि साहित्यिक, लेखक संचालक विजयकुमार गवई यांच्याशी विद्यार्थ्यांनी सुसंवाद साधला. दोन्ही उभयतांचा परिचय आणि कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य प्रा. नवनाथ गोरे यांनी केले. अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त लेखन प्रेरणा दिनी निबंध स्पर्धा घेण्यात आली यामध्ये हर्षद महादेव अवचार, अनुराधा मदनलाल चव्हाण, स्नेहा राहुल मोरे ,विशाल व्यंकटेश राऊत आणि साक्षी प्रदीप आठवले यांनी निबंध स्पर्धेमध्ये गुणानुक्रमे बक्षिसे मिळवली तर मीना कचरे आणि वर्षा आठवले यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य विषयक भितीपत्रकातून त्यांच्या उल्लेखनीय लेखनाचा परिचय करून दिला. त्यानंतर कवी देवानंद पवार यांनी अभ्यासक्रमातील कविता मायेचं चित्रंग ही कविता गाऊन अण्णाभाऊ साठे यांची कविता यावर भाष्य केले त्यानंतर प्रा. विजयकुमार गवई यांनी आपली माय ही कविता सादर करत त्यासोबतच घर घर ते व जातं या वऱ्हाडी बोलीतील कविता सादर करून उपस्थित विद्यार्थ्यांचे मने जिंकली. या सोबतच कविता सुचते कशी ? कविता आणि समाज याविषयी मानव साहित्याचा कसा केंद्रबिंदू आहे हे उलगडून दाखवले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समारोपात उपप्राचार्य प्रा. एन. एम. करडे यांनी उपस्थित मान्यवरांचे साहित्यातील स्थान स्पष्ट करत अण्णाभाऊचे अण्णाभाऊ च्या साहित्य विश्वातील सामाजिकता उलगडून दाखवली. या कार्यक्रमासाठी डॉ. एस. पी .खिल्लारे ,डॉ. बी. एन. शिंदे ,डॉ. एस. पी. बुधवंत, डॉ. प्रज्ञा रुईकर साळवे ,अधीक्षक श्री. राजू पटेकर यांच्यासह महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. दीपा गायकवाड यांनी तर आभार डॉ. सतीश वाघमारे यांनी व्यक्त केले.

## चिकलठाणा शाळेत विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय कीर्तनाचे आयोजन



**छत्रपती संभाजीनगर :** मनपा प्राथमिक व माध्यमिक विद्यालय चिकलठाणा शाळेत देव, देश, धर्म समाज प्रबोधन ग्रुप या तर्फे विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी कीर्तनकार ह. भ. प. सौ. प्रीती जोशी मॅडम यांनी विद्यार्थ्यांना छत्रपती शिवाजी महाराज यांचा पोवाडा, देशभक्त, क्रांतिकारक ,समाजसेवक यांच्या शौर्य कथा ,गीत ऐकवून मंत्रमुग्ध केले . शाळेच्या माजी मुख्याध्यापिका कीर्तनकार ह. भ .प.सौ.सुलभा केतकर मॅडम यांची कार्यक्रमासाठी विशेष उपस्थिती लाभली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री .वसंत राठोड सर, शाळेचे सर्व शिक्षकवृंद आणि सेवक वर्ग यांनी परिश्रम घेतले.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ११ ऑगस्ट २०२६


## तसा येत नाही पाऊस..

तसा
येत नाही पाऊस
पूर्वीसारखा भरभरून आताशा
ढगांच्या उनाडक्या वाढल्याने..

अन् हरवल्या
पोत्याच्या घोंगटयासोबत
कागदाच्या होड्या
या छत्रीधारी कोरड्या काळात..

तसा
आता कोणताच श्रावण
बहरत नाही पूर्वीसारखा
अन् उगत नाही हिरवळ अंगणात
मी श्रावणात जन्मूनही..

तसा
हरलोय डाव
उभ्या जिंदगाणीचा
तरी चालत राहिलो
पायाखालच्या काट्यांना
सोबत घेऊन
अजून युद्ध बाकी असल्यानं..

काळ पुढे जात राहिला
अन् बदलत गेले ऋतू
माणसाळलेल्या
रंगबदलू सरड्यासारखे
वेळ पाहून...

चेहऱ्यावरचं हसूही
परकं झालंय आताशा
आयुष्याचं रान
उन्हात पोळल्या पासून...

फक्त एकच गोष्ट
तशीच आहे अजूनही
माझ्यातला माणूस
अन् बालपण...

काळानं हिरावलं वय
पण मनातलं बालपण
हिरावता आलं नाही त्याला..

म्हणून जगतोय मी
या उन्हाच्या झळांमध्ये
वैशाख वणवा
पाठ सोडत नसला तरी..

**ज्ञानेश्वर गायके,**
**कन्नड**


प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103


# श्रीकृष्ण महाविद्यालयात क्रांतिदिन साजरा



**उमरगा (प्रा. नागसेन कांबळे) :** तालुक्यातील गुंजोटी येथे श्रीकृष्ण महाविद्यालयात इतिहास विभागाच्या वतीने क्रांती दिनाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गुलाब राठोड, प्रमुख उपस्थिती म्हणून प्रा. डॉ. दस्तगीर पठाण आणि प्रा. डॉ. विलास होगाडे हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे व मुख्य वक्ते म्हणून प्रा. डॉ. उमाकांत सूर्यवंशी यांनी अत्यंत संक्षिप्त व मोजकेपणाने ९ऑगस्ट १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्याची पार्श्वभूमी सांगून पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल आणि महात्मा गांधी यांच्या या लढ्यामागील प्रेरणा सविस्तरपणे विषद करत या लढ्याविषयीचे मतमतांतरे सांगून संशलिष्ठ विश्लेषण केले. स्वातंत्र्याचा हा लढा म्हणजे स्वातंत्राची पाहटच होती. १५ ऑगस्ट १९४७ ला जे स्वातंत्र्य मिळाले त्यापाठीमागे लाखो भारतीयांनी दिलेल्या या स्वातंत्र्यलढ्याचे योगदान अभुतपुर्व आहे. अनेक लोकांनी भूमिगत राहून ही चळवळ यशस्वीपणे चालवली. शेकडो लोकांनी आपल्या जीवाची पर्वा न करता या स्वातंत्र्यलढ्यात स्वतःला झोकून दिले. त्यांच्या अमर बलिदानामुळे आज आपण हे स्वातंत्र्य उपभोगत आहोत असे सांगून या संपूर्ण स्वातंत्र्यलढ्यात सर्वसामान्य माणसापासून ते लेखक, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय व अराजकीय नेते , धर्म जात , पंथ असा भेदभाव न करता उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून ही चले जाव चळवळ यशस्वी करून दाखवली. कार्यक्रमाच्या आरंभी व्यासपीठावर असलेल्या सन्माननीय अतिथींच्या हसते महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन झाले आणि या क्रांतिदिनच्या स्वातंत्र्यलढ्यात हुतात्म्य पत्करलेल्या शूरवीरांना दोन मिनिट स्तब्ध राहून श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी प्राध्यापक, प्राध्यापिका, प्राध्यापकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. नागसेन कांबळे यांनी केले तर आभारप्रदर्शन प्रा. डी. पी. चव्हाण यांनी केले. सामूहिक राष्ट्रगीतानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

## जिल्हा परिषद शाळा

शिस्त संस्काराचे पहिले केंद्र,
गावात जिल्हा परिषद शाळा.
शिस्त संस्कार अंगी लावून,
बसविला जगण्याचा ताळा.

जिल्हा परिषद शाळेमधले,
शिक्षक होते खूप कडक.
शिस्त अंगी लावण्यासाठी,
सदा शिक्षा करत होते तडक.

माझी जिल्हा परिषद शाळा,
होती गुणवंताची खाण.
शिस्त संस्कार मूल्यांचे अंगी,
रुजवत होती ती शुद्ध वाण.

संस्काराची शिदोरी होती,
माझी जिल्हा परिषद शाळा.
शिक्षकांभोवती होत होते,
मुलं मुली दररोज गोळा.
जिल्हा परिषद शाळेने केले,
अनेकांवर उपकार खूप खूप.
शाळेतील शिस्त संस्काराने,
सर्वांच्या जीवनाचे बदलले रूप.

तीच जिल्हा परिषद शाळा,
आज मोजते शेवटची घटका.
मोडकळीस आलेले रूप पाहून,
हृदयास माझ्या बसतो चटका.



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**

# गणेशोत्सवात सुरक्षित अन्नाचा संदेश द्या, स्वत:ची शक्ती कमी होऊ देऊ: एफडीए आयुक्त तुकाराम मुंढेंचे वाद्यपथकांना आवाहन



**पुणे :** राज्याचे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी गणेशोत्सवादरम्यान वाद्यपथकांना 'सुरक्षित अन्न, सुरक्षित औषध, सुरक्षित महाराष्ट्र' हा संदेश देण्याचे आवाहन केले आहे. पुणे येथे अभेद्य वाद्यपथकाने आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते, जिथे त्यांच्या कार्याला मानवंदनाही देण्यात आली.

मुंढे यांनी वाद्यपथकातील वादकांना तळलेले पदार्थ आणि एनर्जी ड्रिंक्स टाळून सकस आहार घेण्याचा सल्ला दिला. शक्य असल्यास घरचा डबा सोबत न्यावा आणि परवानाधारक विक्रेत्यांकडूनच खाद्यपदार्थ घ्यावेत, असे त्यांनी सांगितले. गणेशाची भक्ती करताना स्वतःची शक्ती कमी होऊ देऊ नका, असेही ते म्हणाले. सक्षम महाराष्ट्र घडवण्यासाठी तो सुरक्षित असणे आवश्यक आहे, यावर त्यांनी भर दिला.

हा कार्यक्रम अभेद्य वाद्यपथक, कलावंत वाद्यपथक, ढोल ताशा महासंघ महाराष्ट्र आणि नू.म.वि. प्रशाला यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे रस्त्यावरील नू.म.वि. प्रशालेत आयोजित करण्यात आला होता. यावेळी ढोल ताशा महासंघ महाराष्ट्रचे अध्यक्ष पराग ठाकूर, नगरसेवक भारत भूषण बराटे, अभेद्य वाद्य पथकाचे अध्यक्ष रोहन जोशी, सौरभ गुजर, दीपा कुलकर्णी, कलावंत वाद्य पथकाचे सौरभ गोखले, भूषण ताकवले आदी उपस्थित होते. वादकांनी आपल्या वादनातून तुकाराम मुंढे यांच्या कार्याला मानवंदना दिली.

गणेशोत्सवात प्रसाद म्हणून वाटले जाणारे पेढे, लाडू आदी पदार्थ सुरक्षित आहेत का, हा प्रश्न विचारण्याची गरज मुंढे यांनी व्यक्त केली. नागरिकांना सुरक्षित अन्न पुरवणे ही आपली भूमिका असून त्यात कोणतीही तडजोड स्वीकारली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. गणेशोत्सव मंडळांनी अन्नाच्या सुरक्षिततेची विशेष काळजी घ्यावी आणि अन्न व औषध प्रशासनाकडून तपासणी करून घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. प्रत्येक भक्ताला सुरक्षितपणे घरी पाठवण्याची जबाबदारी मंडळांची आहे, असेही ते म्हणाले.

भारताला महासत्ता बनवण्यासाठी केवळ आर्थिक शक्ती पुरेशी नाही, तर वैचारिक अभेद्यताही निर्माण करणे आवश्यक आहे, असे मुंढे यांनी नमूद केले. आर्थिक, सामाजिक आणि वैचारिकदृष्ट्या सक्षम भारत घडवण्यासाठी प्रत्येकाने आपली भूमिका पार पाडली पाहिजे. यशस्वी होण्यासाठी शिस्त हे सर्वात चांगले हत्यार असून, ही गोष्ट वाद्यपथकांमध्ये चांगल्या प्रकारे दिसून येते, असे त्यांनी कौतुक केले. कोणत्याही देशाचे भविष्य तरुणाईच्या विचारांवर अवलंबून असते आणि वाद्यपथकांनी निःस्वार्थपणे केलेले सामाजिक कार्य वाखाणण्याजोगा आहे, असेही ते म्हणाले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), मंगळवार ११ ऑगस्ट २०२६


## मानसिक गुलामी

हजारो पिढ्या भोगत आला
इथला पिचलेला माणूस,
पण कधी तपासलेच नाही त्याने
स्वत:ला—माणूस म्हणून.

कपाळावरच्या रेषांपेक्षा
नशिबाच्या रेषांवर विश्वास ठेवला,
प्रश्न विचारण्याआधीच
हात जोडून डोके टेकवले.

धर्ममार्तंडांनी सांगितले—
“हे तुझ्या पूर्वजन्माचे पाप,
म्हणूनच तुझ्या वाट्याला
दु:ख, दारिद्र्य आणि अपमान.”
आणि त्यानेही मान खाली घातली,
नशिबाला दोष दिला,
देवाच्या नावावर अश्रू ढाळले,
पण कधी
डोके वर करून विचारलेच नाही—
‘सत्य काय?’

ज्याने पिढ्यान्‌पिढ्या
त्याच्या हातात बेड्या घातल्या,
त्याच बेड्यांना त्याने
दैवाचा अलंकार समजले.

ज्यांनी त्याला खाली ठेवले
त्यांनाच त्याने देव मानले,
ज्यांनी त्याचे प्रश्न दाबले
त्यांच्याच शब्दांना
अंतिम सत्य मानले.

ही गुलामी शरीराची नव्हती,
ही होती मनाची गुलामी!
लोखंडाच्या साखळ्या नव्हत्या,
तर विचारांभोवती
घातलेल्या अदृश्य बेड्या होत्या.

त्याला तलवार नको होती,
त्याला फक्त
एक प्रश्न विचारायचा होता—
“मी माणूस आहे,
मग माणसासारखे जगण्याचा
माझा अधिकार कुणी हिरावून घेतला?”

हा प्रश्न पडला असता
तर कदाचित इतिहास बदलला असता,
देवाच्या नावावर चालणाऱ्या
अनेक बाजारांना
कुलूप लागले असते.

पण प्रश्न विचारण्याऐवजी
त्याने श्रद्धेला कवटाळले,
विवेकाला दूर लोटले
आणि आपल्या दु:खालाच
पूर्वजन्माची शिक्षा समजले.

आजही वेळ गेलेली नाही—
डोळे उघडा,
पुस्तक उघडा,
विचार उघडा,
आणि सर्वात आधी
आपले डोके उघडा!
कारण—
देवाने दिलेली म्हणे
ही शिक्षा नाही,
माणसाने माणसावर लादलेली
ही व्यवस्था आहे.

आणि व्यवस्था बदलण्यासाठी
चमत्काराची गरज नाही—
फक्त एक जागृत माणूस,
एक निर्भय प्रश्न
आणि सत्य शोधणारे
एक स्वतंत्र डोके पुरेसे आहे!

**डॉ. बाळासाहेब लिहिणार**

## बार्टीच्या अधिछात्रवृत्तीच्या जागा वाढवण्याची मागणी; आंदोलनाचा इशारा!



**पुणे :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) अंतर्गत पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात नव्याने स्थापन झालेल्या 'आंबेडकराईट स्टुडंट असोसिएशन' च्या शिष्टमंडळाने समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे यांची भेट घेऊन त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली. मागण्या मान्य न झाल्यास 19 ऑगस्ट 2026 पासून बेमुदत धरणे आंदोलनाचा इशाराही संघटनेने दिला आहे.
या बैठकीत शिष्टमंडळाने बार्टी अधिछात्रवृत्तीच्या जागांची संख्या केवळ 100 न ठेवता ती किमान 600 करावी आणि 35 वर्षांची जाचक वयोमर्यादेची अट पूर्णपणे रद्द करावी, या प्रमुख मागण्या प्रशासनासमोर मांडल्या.
विद्यार्थ्यांच्या भावना आणि मागण्यांची गांभीर्यपूर्वक दखल घेत आयुक्त दीपा मुधोळ यांनी या विषयावर सविस्तर चर्चा करून पुढील निर्णय घेण्यासाठी बुधवार, दिनांक 12 ऑगस्ट 2026 रोजी निबंधक (बार्टी) यांच्या समवेत एका विशेष बैठकीचे आयोजन केले आहे.
समाजकल्याण आयुक्त दीपा मुधोळ यांच्यासोबत झालेल्या या महत्त्वपूर्ण चर्चेत 'आंबेडकराईट स्टुडंट असोसिएशन' च्या विद्यार्थी शिष्टमंडळाचे नेतृत्व राहुल डंबाळे, राहुल ससाने, अक्षय कांबळे, सिद्धार्थ ओव्हाळ, सुरेखा मेश्राम, प्रथमेश सूर्यवंशी आणि नितीन आंधळे यांनी केले. त्यांनी विद्यार्थ्यांची बाजू अत्यंत प्रखरपणे प्रशासनासमोर मांडली.
12 ऑगस्ट रोजी होणाऱ्या बार्टी निबंधकांसोबतच्या बैठकीत विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर ठोस आणि सकारात्मक निर्णय न झाल्यास, सर्व संशोधक विद्यार्थ्यांनी एकत्र येत 19 ऑगस्ट 2026 पासून पुणे येथील समाजकल्याण आयुक्त कार्यालयासमोर 'बेमुदत धरणे आंदोलन' करण्याचा ठाम निर्णय घेतला आहे. शैक्षणिक संधींमधील भेदभाव आणि जाचक अटींविरोधात संपूर्ण महाराष्ट्रातील मागासवर्गीय विद्यार्थी या आंदोलनात मोठ्या संख्येने उतरणार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे.






# निधन वार्ता



**दौलताबाद :** काशिनाथ लक्ष्मण कांजूणे (गाईड) वय 80 वर्षराहणार गवळीवाडा दौलताबाद यांचे दि 09 रविवारी पहाटे दोन वाजता अल्पशा आजाराने निधन झाले आहेत्यांचे अंत्यविधी दौलताबाद येथील स्मशानभूमीत सकाळी दहा वाजता करण्यात आले आहे त्यांच्या पश्चात दोन मुले, तीन मुली,सुना, जावई,नातवंडे असा परिवार आहे माजी सरपंच संजय कांजूणे यांचे ते काका होतेते दौलताबाद किल्ल्यावर भारतमाता मंदिराचे पुजारी होते

# चित्रकार श्रीधर अंभोरे यांचे निधन



**जालना :** जालना येथील प्रख्यात चित्रकार श्रीधर अंभोरे यांचे सोमवारी पहाटे निधन झाले, मृत्यूसमयी ते 79 वर्षांचे होते. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते, रूग्णालयात औषधोपचार सुरू असताना त्यांचे निधन झाले. श्रीधर अंभोरे यांनी महाराष्ट्रातील अनेक लेखक, कवींचे मुखपृष्ठ सजवून दिले होते. आपल्या श्रीधर रेषांनी अनेक अर्थपूर्ण चित्रे रेखाटली होती. त्यांच्या पार्थिवावर सोमवारी दुपारी जालना शहरातील रामतीर्थ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी झालेल्या शोक सभेत महाराष्ट्रातील विविध भागातून असंख्य लेखक कवींच्या उपस्थितीत प्रत्येक विभागातील लेखक कवींनी आपल्या भावना व्यक्त केल्या. रवींद्र इंगळे ,सुरेश साबळे, दासू वैद्य,उत्तम अंभोरे, अशोक इंगळे, मनोज पाठक , रवींद्र सातपुते, अशोक कोतवाल, शेषराव धांडे, राजेंद्र राख राजेश ओ. राऊत यांनी श्रध्दांजली पर मनोगत व्यक्त केले.भ्रमणध्वनी द्वारे लेखक रामदास फुटाणे,श्रीकांत देशमुख,यशवंत मनोहर,सुमती लांडे,सतीश बडवे दा. गो. काळे, चित्रकार भ. मा. परसावळे,धनंजय गोवर्धन आदींचे शोक संदेश पंडित तडेगावकर यांनी वाचून दाखवले . यावेळी शशिकांत शिंदे, संदीप काळे, नंदकिशोर आढाव,सतीश डेरेकर, दिलीप खोटे, मिलींद बागुल, सत्यजित साळवे, , सुधाकर कुराडे,बापू पानपाटील , रवींद्र साळवे, दिलीप सपकाळे, अनिल कांबळे, महेंद्र ताजने,बबन महामुने, डॉ.संजीवनी तडेगावकर,सुहास पोतदार, प्रभाकर शेळके, नारायण पाझाडे, शांतीलाल बनसोडे,प्राचार्य सोलाट, राम कदम, राम गायकवाड, विजय कुमठेकर, रावसाहेब ढवळे,जगत घुगे, यशवंत सोनूने,राम सावंत, नारायण बोराडे,विनोद जैतमहाल, शिवाजी मदन, बाबु श्रीरामे,जिजा वाघ,पंडित रानमाळ,कैलास भाले, संतोष लव्हटे आदी याप्रसंगी हजर होते.